क्र..9 / जि.पु.अ. / वलि / वशि - 348 / 08
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर. दिनांक 12 मे, 2008

## महाराष्ट्र शासन
### अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
### वाहतुक निविदा सुचना

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे करीता व त्यांच्यावतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून 19.6.2008 ते 30.6.2011 करिता दोन्ही दिवस धरून या कालावधीकरीता नागपूर जिल्हयासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील व इतर योजनेतील अन्नधान्य वाहातुकीचे कंत्राट निश्चित करण्याकरीता वाहातुक कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी द्वि लिफाफा पध्दतीने जाहीर खुल्या निविदा मागविण्यात येत आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाण राहील.

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| 1 | निविदा फॉर्म विक्री करणे | 20.5.2008 ते 3.06.2008 |
| 2 | इसारा रक्कम चलानद्वारे भरणे | निविदा सादर करण्यापूर्वी |
| 3 | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | 6.06.2008 (दुपारी 2.00 वाजेपर्यंत) |
| 4 | निविदा उघडणे | 6.06.2008 (दुपारी 4.00 वाजता) |

(अ) धान्य वाहतुकीच्या अंतराचे टप्पे व आधारभूत दर खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

| टप्पा | कि.मी. | आधारभूत दर (Base Rtae) |
|---|---|---|
| 1 | 0 ते 2 कि.मी. | रू. 30 प्रतिटन (संपूर्ण अंतराकरीता) |
| 2 | 2 ते 10 कि.मी. | रू. 6/- प्रतिटन प्रति कि.मी. |
| 3 | 10 ते 50 कि.मी. | रू. 4.80/- प्रतिटन प्रति कि.मी. |
| 4 | 50 कि.मी. च्या पुढे | रू. 3/- प्रतिटन प्रति कि.मी. |

(ब) धान्य वाहतुकीसाठी निविदेमध्ये सर्व टप्याकरीता एकच वाहतुक दर मागविण्यात येत आहे.

(क) अन्नधान्य वाहतुकीच्या अंतरानुसार वाहतुक देयकाची परिगणना टप्पेनिहाय करण्यात येईल.

(ड) निविदादारकाकडे मालकीचे 14 व तेवढेच नियंत्रणाखाली 14 किमान 9 मे.टन वाहनभार क्षमतेचे ट्रक्स उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(ई) निविदा अर्जाचा कोरा निविदा फॉर्म ना परतावा शुल्क रू. 5000 (अक्षरी रू. पाच हजार फक्त) चालानद्वारे लेखा शिर्ष 0408 अन्न व वखार साठवण, 800 इतर बाबी, संकेतांक 0408001500 या सदराखाली कोषागारात भरून त्याची मुळ चालान सादर केल्यानंतर निविदा अर्ज मिळतील.

(फ) निविदेचा विहीत नमुना व अटीं शर्तीसह जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात दि. 20.5.2008 ते 3.06.2008 या काळात सुट्टीचे दिवस वगळून कामकाजाच्या वेळेत मिळू शकतील.

अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने व करीता

Vahtuk Nivida

– निविदेच्या अटीं व शर्ती –

1. नागपूर जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील व इतर योजनेतील अन्नधान्य वाहातुकीसाठी निविदा मागवून कंत्राट निश्चित करण्यात येत आहे. सदर कंत्राटचा कालावधी 3 वर्षाचा राहील. ज्या तारखेला मंजूर निविदाधारकाशी करारनामा करण्यात येईल त्या तारखेपासून कालावधी सुरु होउन तो पुढील तीन वर्षापर्यंत असेल. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा कंत्राटचा कालावधी 2 महिन्यापर्यंत वाढविण्यात येईल. तथापि काही अपरीहार्य कारणास्तव (उदा. निवडणूक आचारसंहीता, नैसर्गिक आपत्ती इत्यादी) निविदा मागवून कंत्राट निश्चित करणे शक्य नसल्यास त्या कालावधी पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात येईल.
2. निविदादारकाकडे स्वतःचे मालकीचे 14 व तेवढेच नियंत्रणाखाली 14 किमान 9 मे.टना वाहनभार क्षमतेचे ट्रक्स कंत्राटच्या पूर्ण कालावधीसाठी असणे आवश्यक आहे. माल वाहातुकीसाठी उपयोगात येणा–या वाहना व्यतिरिक्त कोणतेही वाहन ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच निश्चित केलेल्या संख्येएवढे मालकीचे व नियंत्रणाखालील ट्रक्स कंत्राटदाराकडे कंत्राटच्या पुर्ण कालावधीसाठी असणे आवश्यक आहे.
3. भागीदारी संस्था/सहकारी संस्थांच्या बाबतीत भागीदार/संचालक/सभासदांचे नावाने असलेले ट्रक विचारात घेतले जातील. भागीदार/संचालक/सभासद अन्नधान्य वाहतुक कामासाठी ट्रकची आवश्यकता राहील. तेव्हा ते त्यांचे ट्रक्स उपलब्ध करून देतील, अशा आशयाचे शपथपत्र संबंधित भागीदार/संचालक/सभासद यांनी निविदे सोबत सादर करणे बंधनकारक राहील.
4. निविदेसोबत सादर करण्यात येणा–या मालकीच्या व नियंत्रणाखाली येणा–या ट्रक्सच्या मालकीबाबत व ते वापरण्यात योग्य असल्याबाबत सक्षम परिवहन अधिका–याच्या प्रमाणपत्राची (आरसी बूक सह फिटनेस सर्टिफिकेट) साक्षांकित केलेली सत्यप्रत निविदेसोबत जोडलेली असावी.
5. निविदेसोबत सादर केलेल्या ट्रक्स महाराष्ट्र मोटर वाहन कायदा 1988 चे कलम 90 (7) अंतर्गत असावे.
6. निविदेसोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीचे ट्रक्स व नियंत्रणाखाली ट्रक्स दुस–या जिल्हयातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट/करारनाम्यासाठी उपयोगात आणणार नाही असे शपथपत्र जोडणे आवश्यक राहील.
7. करारनामा करतेवेळी किंवा करारनामा झाल्यावर निविदाधारकाने सादर केलेले मालकीचे व नियंत्रणाखालील ट्रक्स अन्य जिल्हयातील अन्नधान्य तसेच इतर कोणत्याही वाहातुकीच्या कंत्राट/करारनाम्यासाठी उपयोगात आणल्याचे निदर्शनास आल्यास कंत्राट रद्द करण्यात येईल.
8. निविदा पध्दती ही उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या क्र. भाकस/1094(2679)/उद्योग–6 दि. 30. 3.1994 च्या शासन निर्णयानुसार व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार द्विलिफाफा पध्दतीप्रमाणे राहील. द्विलिफाफयापैकी लिफाफा 'अ' तांत्रिक लिफाफा व लिफाफा 'ब' वाहातुक दराचा राहील. सदर दोन्ही लिफाफे स्वतंत्र लिफाफयात मोहोरबंद केलेले असावे. तांत्रिक लिफाफयात मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे व निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता केलेली असावी व लिफाफा ब मधे वाहातुकीचे दर असावे.
9. तांत्रिक लिफाफयाच्या कागदपत्रांची पुर्तता निविदा सादर करतेवेळी पुर्ण केलेली असावी. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाही. तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रात अटी/शर्तीमधे नमूद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

10. लिफाफा ब मधे फक्त दर नमूद करण्यात यावे दराची छायाप्रत ग्राहय धरण्यात येणार नाही

11 निविदा अथवा निविदेमधे कोणतीही अट अथवा पर्याय देता येणार नाही अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

12. धान्य वाहातुकीच्या कंत्राटासाठी जिल्हा अंतर्गत वाहातुक व आंतरजिल्हा वाहातुक असे दोन प्रकार न ठेवता, धान्य वाहातुकीसाठी निविदेमधे एकच वाहातुक दर मागविण्यात येत आहे. त्यानुसार धान्य वाहातुकीच्या अंतराचे टप्पे व आधारभुत दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.

धान्य वाहतुकीच्या अंतराचे टप्पे व आधारभूत दर खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

| टप्पा | कि.मी. | आधारभूत दर (Base Rtae) |
|---|---|---|
| 1 | 0 ते 2 कि.मी. | रू. 30 प्रतिटन (संपूर्ण अंतराकरीता) |
| 2 | 2 ते 10 कि.मी. | रू. 6/— प्रतिटन प्रति कि.मी. |
| 3 | 10 ते 50 कि.मी. | रू. 4.80/— प्रतिटन प्रति कि.मी. |
| 4 | 50 कि.मी. च्या पुढे | रू. 3/— प्रतिटन प्रति कि.मी. |

13. अन्नधान्य वाहातुकीच्या अंतरानुसार वाहातुक देयकाची परीगणना टप्पे निहाय करण्यात येईल. म्हणजेच 60 किलोमिटर अंतराची वाहातुक झाली असेल तर, त्यासाठी पहील्या 2 किलोमिटर अंतराकरीता पहील्या टप्प्याच्या दराने, तद्नंतर दुस—या, तिस—या व चौथ्या टप्प्याच्या अंतरासाठी त्या त्या टप्प्याच्या दराने वाहातुक देयकाची परीगणना करण्यात येईल.

14 धान्य वाहातुकीची अंतरे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेकडून प्रसिध्द केलेल्या वाहातुकीच्या टेबल ऑफ डिस्टन्स या पुस्तिकेतून घेण्यात येईल. जर टेबल ऑफ डिस्टन्स ही पुस्तिका उपलब्ध नसल्यास किंवा पुस्तिकेत अंतरे प्रसिध्द केली नसल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिका—यांकडून अंतरे प्रमाणित करुन घेण्यात येईल.

15. सदर वाहातुकीची अंतरे सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या संदर्भ बिदुपासून (0 पॉईंट ते 0 पॉईंट) व जवळच्या मार्गाने प्रमाणित केलेले असतील.

16. एकाच शहरातील/गावातील वाहातुकीसाठी सुध्दा संदर्भ बिदू ते संदर्भ बिंदूपर्यंत प्रमाणित केलेल्या अंतरानुसार म्हणजेच अंतराचा पहिला टप्पा 0 ते 2 कि.मी.या टप्प्यातील वाहातुकीचे अंतर विचारात घेण्यात येईल.

17.निविदा मंजूर केल्यानंतर करारनामा करण्यापुर्वी निविदाधारकाकडून **एकूण 30 लाख (तीस लक्ष)** एवढी बॅक गॅरंटी घेण्यात येईल व ही बॅक गॅरंटी केवळ अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बॅकेची असावी.

18.निविदा मंजूर केल्यानंतर करारनामा करण्यापुर्वी निविदाधारकाकडून **रु.40 लाख (चाळीस लक्ष)** महसूल ऐपत प्रमाणपत्र घेण्यात येईल व हे महसूल ऐपत प्रमाणपत्र कंत्राटाच्या पुर्ण कालावधीसाठी आवश्यक राहील त्याची मुदत वेळोवेळी वाढवून देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यशस्वी निविदादारकास महसूल ऐपत प्रमाणपत्रात नमूद केलेली स्थावर मालमत्ता कंत्राट कालावधी पर्यंत (वाढीव कालावधीसह) शासनाच्या परवानगीशिवाय विकता येणार नाही.

19. महसूल ऐपत प्रमाणपत्र भागीदाराच्या नावाने किंवा सहकारी संस्थेच्या संचालकाच्या/सभासदाच्या किंवा दुस—या व्यक्तिच्या नावाने असल्यास महसूल ऐपत प्रमाणपत्रदाराला रु.100/—च्या स्टॅम्प पेपरवर सर्व दायीत्व संपूर्णपणे व पृथकपणे जबाबदार असल्याचे संमतीपत्र लिहून दयावे लागेल.

20. संबंधित निविदादारकाने मुळ महसूल ऐपत प्रमाणपत्र न दिल्यास त्याच्याकडून साडेतीन वर्ष कालावधीची अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बॅकेची साडेतीन वर्ष कालावधीची रु. 40 लाख अतिरिक्त बॅक गॅरंटी घेण्यात येईल. व ही बॅक गॅरंटी अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बॅकेची असणे अनिवार्य आहे.

21. धान्य वाहातुकीची निविदा सादर करण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन अथवा निमशासकीय कार्यालये/संस्थेच्या वाहातुकीच्या कामाचा दोन वर्षाचा अनुभव असणे अनिवार्य राहील. खाजगी व्यक्तिकडील वाहातुकीच्या कामाचा अनुभव विचारात घेण्यात येणार नाही.

22. केंद्र शासन, राज्य शासन, निमशासकीय कार्यालये/संस्थांकडील सर्व प्रकारच्या वस्तुंच्या (उदा. अन्नधान्य, लेव्ही साखर, सिमेंट, खत, कापूस, रुईच्या गाठी इत्यादी) वाहातुकीचा अनुभव विचारात घेण्यात येईल.

23. वाहातुकीचा **अनुभव 30,000 मे.टन (तीस हजार टन)** असणे आवश्यक आहे.

24.. भागीदारी/सहकारी संस्थांचे भागीदार/संचालक/सभासद यांचे नावे असलेले अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

25. निविदेसोबत इसारा रक्कम ही **10 लाख** भरणे बंधनकारक राहील. इसा–याची रक्कम ही निविदा सादर करणेपुर्वी चलानद्वारे भरुन चलानची प्रत निविदे सोबत सादर करण्यात यावी. अथवा इसारा रक्कम ही अनुसूचित अथवा राष्टीयकृत बॅंकेची दर्शनी हुंडी (डिमांड ड्राफट) असणे आवश्यक आहे. ज्यांनी इसारा रक्कम भरली असेल त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांची इसा–याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

26. संबंधित निविदाकारास **रु. 10 लाख** प्रतिभुती ठेव म्हणून जमा करावी लागेल त्यापैकी 50 टक्के रक्कम करारनामा करणेपुर्वी व 50 टक्के रक्कम प्रत्येक महिन्याच्या देयकातून 10 टक्के प्रमाणे (5 हप्त्यात) कपात करुन देण्याची मुभा राहील.

27.भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक 8.10.1993 च्या परिपत्रकातील परीच्छेद क.5.3 नुसार सर्व प्रकारच्या वाहातुक कंत्राटदारांना आयकर अधिनियम 1961 च्या सेक्शन 194 (सी) ची तरतुद लागू राहील. या सदर्भात वित्तीय सल्लगार व उपसचिव यांचेंकडील परीपत्रक क.का–1/398/ 7922, दिनांक 9 डिसेंबर 1996 अन्वये वाहातुक ठेकेदाराच्या देयकातून 2 टक्के आयकराची रक्कम तसेच विहीत दराने सदर रक्कमेवरील सरचार्जची रक्कम कपात करण्यात येईल.

28.मंजूर निविदादारकास निविदा मंजूरीनंतर 7 दिवसाचे आत सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन **रु.100/** च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक आहे. मंजूर निविदाकाराने करारनामा करण्यास नकार दिला किंवा करारनामा न केल्यास लगतच्या न्युनतम निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल व करारनामा करण्यास नकार देणा–या निविदाकाराची संपूर्ण इसारा रक्कम जप्त केली जाईल.

29. तसेच निविदा सादर केल्यानंतर निविदा नमुन्यातील परिच्छेद 2 नुसार निविदाकार हा करारनाम्या तील तरतुदींना बांधील राहील त्यामुळे करारनाम्याच्या मसूदयातील कलमानुसार लगतच्या न्युनतम निविदाकाराची निविदा मंजूर केल्यामुळे शासनाने मंजूर करावयाची अतिरिक्त रक्कम स्टेट बॅंक ऑफ इंडिया "पी.एल.आर" अधिक 2 टक्के (प्राईम लेंडिंग रेट)व्याजासह करारनामा न केलेल्या निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल. सदर वसूली जमीन महसूलीच्या थकबाकीची रक्कम म्हणून वसूल करण्यात येईल..यासाठी निविदाकाराकडून निविदेसोबत **रु. 100/**–च्या स्टॅम्प पेपरवर त्यांचेकडील स्थावर संपत्ती/मालमत्तेचा तपशिल व सदर मालमत्ता निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यंत विकण्यात येणार नाही अशा आशयाचे शपथपत्र देणे आवश्यक राहील.

30.कंत्राटदाराने भारतीय अन्न महामंडळाच्या अथवा प्रसंगतः शासनाच्या वा अन्य गोदामात आणलेल्या टकमधे अन्नधान्य भरतांना ट्क चालकाने कंत्राटदाराचे लेटरहेडवर विशिष्ट ट्क भरुन घेण्याबाबतचे प्राधिकारपत्र सादर केल्यानंतरच ट्क भरुन देण्यात येईल. अप्पर जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधीने व गोदाम व्यवस्थापक/गोदामपाल यांनी ट्कच्या नंबरप्लेटवरील नोंदणी कमांक व विहीत नमुन्यातील प्राधिकारपत्र व त्यावरील ट्कचा नोंदणी कमांक याच्या खरेपणाची खातरजमा करुन तसेच

वाहनचालकाचा परवाना व त्यावरील फोटो याची काळजीपुर्वक तपासणी करुन वाहनचालक म्हणून हजर असलेली व्यक्ती व प्राधिकारपत्रात असलेली व्यक्ती एकच असल्याची खात्री करुन घेण्यात येईल.

31. केंद्र शासनाने डिझेलच्या दरात किंवा केंद्र वा राज्य शासनाने सांविधीक शुल्क वा करात सुधारणा केल्यामुळे वाहातुक कंत्राटच्या कालावधीत डिझेलच्या दरात 5 टक्केपेक्षा अधिक वाढ झाल्यास कंत्राटदारास प्रमाणशिर दरवाढ देण्यात येईल. तसेच कंत्राटच्या कालावधीत डिझेलचे दर 5 टक्क्याहून कमी झाले तर त्याप्रमाणात कंत्राटदाराच्या देय रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

32. निविदाफार्मची किंमत प्रत्येकी रु.5000/– (अक्षरी पाच हजार )ठेवण्यात आलेली आहे. ही रक्कम चलानद्वारे बॅकेत जमा करावी व चलान कार्यालयात सादर केल्यानंतर नंतर निविदा अर्ज देण्यात येईल. निविदे सोबत भागीदारी फर्म/सहकारी संस्थांचा नोंदणी दाखला नियमावली व भागीदारी पथक जोडणे आवश्यक आहे.

33. कंत्राटदारास उपकंत्राटदाराची नियुक्ती करता येणार नाही. आवश्यकता भासल्यास कंत्राटदारास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन दयावी लागेल.

34.. निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे राजपत्रित अधिका–यांकडून साक्षांकित केलेली असणे आवश्यक आहे. निविदा उघडतेवेळी साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

35. निविदा फॉर्म दिनांक 20.5.2008 ते 3.6.2008 पर्यंत कार्यालयीन कामाकाजाच्या वेळेत (सुटीचे दिवस वगळून) जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध राहातील.

36. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख 6.6.2008 ला दुपारी 2.00 वाजेपर्यंत राहील या तारखेनंतर व विहीत वेळेनंतर प्राप्त झालेल्या निविदा अर्जाचा विचार केला जाणार नाही. विहीत कालावधीत प्राप्त सिलबंद निविदा दिनांक 6.6.2008 रोजी दुपारी 4.00 मा. अपर जिल्हाधिकारी नागपूर यांचे दालनात उघडण्यात येतील याची निविदाकाराने नोंद घ्यावी.

37. धान्य वाहातुकीसाठी वापरण्यात येणा–या ट्रकवरील वाहनचालक, क्लिनर, व या प्रकियेत लावण्यात येणा–या वराई कामगारांचा विमा उतरविण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. करारनामा करतेवेळी संबंधित विमा कंपनीच्या कागदपत्रांच्या प्रति पुराव्या दाखल सादर करणे बंधनकारक राहील.

38. कामगार भरपाई अधिनियम अंतर्गत धान्य वाहातुकीसाठी लावलेल्या कामगारांच्या नुकसान भरपाईची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

39. जिल्हा पुरवठा कार्यालयाने आदेशित केल्याप्रमाणे कंत्राटदारास मासीक अन्नधान्य नियतनाची उचल विहीत मुदतीत पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या आदेशानुसार कंत्राटदारास दररोज आवश्यक तेवढे ट्रक उपलब्ध करुन दयावे लागतील तसेच अप्पर जिल्हाधिकारी यांनी आदेशित केल्यास शासनाच्या इतर योजने अंतर्गत अन्नधान्याच्या वाहातुकीचे काम सुध्दा करावे लागेल अन्यथा अन्नधान्याची उचल न केल्यामुळे व्यपगत झालेल्या अन्नधान्याच्या रक्कमेच्या 10 टक्के दंड कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

40. वराईची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

41. धान्याची वाहातुक करतांना येणा–या तुटीस निविदादारक स्वत: जबाबदार राहील व येणा–या तुटीची रक्कम कंत्राटदारास दयावयाच्या रक्कमेतून कपात करण्यात येईल. तसेच धान्याचा अपहार व चोरीची रक्कम बाजारभावाने वसूल करण्यात येईल.

42. संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत किंवा अस्विकृत करण्याचा अधिकार अप्पर जिल्हाधिकारी/शासनाला राहील.

43. करारनाम्याच्या कालावधीत किंवा त्यानंतर करारनाम्या अंतर्गत किंवा त्या संबंधात कोणताही विवाद उद्भवल्यास संबंधित विभागीय आयुक्त किंवा त्यांनी त्या संबंधात प्राधिकृत केलेल्या अधिका–याकडे (लवाद) निर्दिष्ट करण्यात येईल. अशा प्रकारच्या संदर्भावर लवाद अधिनियम 1940 च्या तरतुदी नुसार किंवा त्यामधील सुधारणा नुसार कार्यवाही करण्यात येईल व लवादाने दिलेला निर्णय अंतिम राहील व दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.

44. जीवनावश्यक वस्तु अधिनियम 1955 खाली ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल होउन दंड अथवा शिक्षा झाली असल्यास अशांना वाहातुक निविदेत भाग घेता येणार नाही.

45. केंद्र शासनाने 1 जानेवारी 2003 पासून वाणिज्यीक कंत्राट घेण्यासाठी निविदा भरतेवेळी कोणत्याही व्यक्तीला आयकर निपटारा प्रमाणपत्र सोबत देण्याची आवश्यकता नाही अशा सुचना सर्व आयकर आयुक्तांना दिलेल्या असल्याने निविदे सोबत आयकराचे पुर्ततेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक नाही.

46 सर्व निविदाकारांची दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून 120 दिवस विधीग्राहय राहातील मात्र या कालावधी मधून निविदा प्रकिये बाबत न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्यासाठी लागणारा कालावधी वगळण्यात येईल. निविदा उघडल्यानंतर दराबाबतचा कोणताही बदल स्विकारण्यात येणार नाही. निविदेच्या विधीग्राहयतेच्या कालावधीत निविदा मंजूर करण्या बाबत जर निर्णय होउ शकला नाही व त्यानंतर संबंधित निविदाकाराने त्याने दिलेल्या दरात बदल करण्याचे प्रस्तावित केले तर अशा प्रत्येक प्रकरणी गुणवत्ते नुसार निर्णय घेण्यात येईल.

47. महाराष्ट्र शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क.कंत्राट/007/631/प्र.क.864/नापू–16–अ, दिनांक 4 डिसेंबर 2007 व त्यात शासन वेळोवेळी करेल त्या सर्व सुधारणा निविदादारकास बंधनकारक राहातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर**
**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने व करीता**

प्रतिलिपी :–

1. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई–32 यांना माहीतीकरीता सादर.
2. उपआयुक्त (पुरवठा) नागपूर विभाग, नागपूर यांना माहीतीकरीता सादर.
3. जिल्हाधिकारी ................................ (सर्व) यांना माहीतीकरीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी सादर.
4. तहसिलदार ................................(सर्व) यांना माहीतीकरीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित
5. जिल्हा नाझर,जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर निविदा सुचना फलकावर लावून प्रसिध्द करावी.
6. जिल्हा राष्ट्रीय सुचना विज्ञान अधिकारी यांना जिल्हयाच्या व शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

अतिरिक्त जिल्हाधिकारी
नागपूर